FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154174

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: १८, वर्ष Year: २०२१, दिनांक Date: १८/०३/२०२१

2. (i) अधिनियम Act: म.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: ५, ६ (क)
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: बुधवार, तारीख पासून Date from: १५/०३/२०२१, वेळ Time: १८:२५, तारीख पर्यंत Date to: १८/०३/२०२१, वेळ Time: १६:०५
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: १५/०३/२०२१, वेळ Time: १६:००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०३, तारीख Date: १८/०३/२१, वेळ Time: ०५:१५

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: आर.सी. आय गेट समोरील विरुद्ध दिशेचा फुटपाथ, ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road: रेडिओ क्लबच्या
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: विरुद्ध दिशेचा, गाव Village: फुटपाथ, पोस्ट Post: मुंबई, तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हदीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: किरण लक्ष्मचंद्र कोळी
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: लक्ष्मचंद्र
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४० वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ८८१९९८७९८३
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनाक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..., (f) व्यवसाय Occupation: मासेमारी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: कोळी, जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address: रूम नं. ७, पहिला मजला, प्रोजो डोकस, अंबोबा मंदिर जवळ, गल्ली / सर्वे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/Mo. No., पॅन नं. PAN No., कार्ड नं. Card No.: गणेश निगेम शेड
   रस्त्याचे नाव Road: कुलाबा, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: मुंबई, गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) संदिप कारभारी गिते, रा. ठि. गोकुळ बिल्डिंग, बी विंग, ५ वा मजला, रू. नं. ५०३, मायखला बकरी अड्डा भायखळा (प.), मुंब. मुम. जोशी मार्ग, मुंबई.

२) मुजफ्फर अली बाबु अली सय्यद ऊर्फ बबलु, रा. ठि. रूम नं. २०१, बि. नं. ८, अलपुर अपार्टमेंट अमृतनगर, जोगेश्वरी (प.), मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. किरण लालचंद्र कोळी, वय ४७ वर्षे यांची तक्रार स्वतंत्र पानावर अंगणीकृत करून यासोबत जोडण्यात आली आहे. सदर तक्रारीस "फिर्याद" म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with CamScanner

फिर्याद दि. १८/०३/२०२१

श्री. किरण लालचंद्र कोळी वय ४७ वर्षे, धंदा– मासेमारी व्यवसाय रा.ठि. रुम. न. १७ ए ,पहिला मजला, खोजा हाउस, खंडोबा मंदिर जवळ, लाल निगम रोड, कुलाबा, मुंबई, मो.न. ९६१९९६७१८३

.........

मी वरिलप्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटुबियांसह रहात असुन माझा ससून डॉक येथे मच्छीमारीचा व्यवसाय आहे.

आमच्या मालकीच्या बोटीचे सामान व बोटीवरील खलाश्याना रहाण्याकरीता ससुन डॉक येथील बी.पी. टी.च्या पडीक जागेवर गोडावून बांधकाम करण्याचे परवानगी मिळण्याकरीता मी म.न.पा. ए वार्ड, फोर्ट, मुंबई येथे अर्ज दिला आहे. तसेच सदर जागेवर गोडावुन बांधकाम करण्याचे कंत्राट आमचे विभागातील अनेक बांधकाम केलेल्या बबलु नावाचे कंत्राटदाराला दिले आहे. सदर गोडावुन बांधकामाकरीता एक करोड रुपये खर्च येईल असे सांगुन बबलू याने बांधकामाचे कोटेशन दिले आहे.

म.न.पा.,ए वार्ड येथे परवानगी मिळण्याकरीता अर्ज देवनु बराच कालावधी झाला होता, तरी म.न.पा. कडुन मला परवानगी मिळाली नाही. पावसाळा सुरु होण्यापुर्वी मला बांधकाम करावयाचे असल्याने म.न.पा. कडुन परवानगी मिळण्याकरीता मी व बबलु कंत्राटदार असे ए वार्ड म.न.पा. कार्यालयात दि.०८/०३/२०२१ रोजी गेलो असता, बबलु कंत्राटदार यांचे परिचयाचे ए वार्ड येथील सहायक अभियंता श्री गिते यांनी बांधकाम करावयाचे असेल तर पन्नास लाख दयावे लागतील तरच परवानगी मिळेल असे सांगितले. पन्नास लाख खुप मोठी रक्कम असल्याने मी रक्कम कमी करण्याची श्री. गिते यांना विनंती केली असता, रु ३५,००,०००/– रक्कम घेवुन परवानगी देण्यास ते तयार झाले. सदर रक्कमेबाबत मी माझे मोठया भावासोबत विचारविनीमय केला असता, श्री गिते यांनी मागणी केलेली रक्कम ही कोणतीही शासकिय फी नाही. तसेच मागणी केलेली रक्कम रु. ३५,००,०००/– लाच स्वरुपात श्री. गिते यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १५/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक १५/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे पो.नि. राहुल कारभारी यांचेकडे लोकसेवक श्री. गिते यांचे विरुध्द मराठीमध्ये हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. पो.नि. कारभारी यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले.

मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनु ंगाने घेण्यात येणारे कारवाईकरिता स.पो.आ. श्रीमती. देशमुख या पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पहाणार असल्याचे सांगून. स.पो.आ. श्रीमती देशमुख यांचेशी माझी ओळख करून दिली. नंतर मला पडताळणी कारवाई बाबतच्या योग्य त्या सुचना देवून माझे सोबत पंच श्री. विकास कोरडे हे लोकसेवक श्री. गिते यांना त्यांच्या कार्यालयात भेटण्याकरीता पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. आम्ही लोकसेवक श्री. गिते यांची प्रत्यक्ष भेट घेण्याकरिता पोलीस वाहनाने निघालो असताना रस्त्यात कंत्राटदार बबलु यांनी मला फोनवर सांगितले की, लोकसेवक श्री गिते हे कार्यालयात नसुन ते सुटटीवर आहेत, ते दि.१७/०३/२०२१ रोजी कार्यालयात येणार आहे तेव्हा आपण भेटु असे सांगितल्याने आम्ही परत ला.प्र.वि. कार्यालयात आलो.

त्यानंतर दि.१७/०३/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन कार्यालयातील कामकाज संपवुन मी, पंच व पोलीस पथक पोलीस वाहनाने लोकसेवकाची भेट घेण्याकरिता त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. हॉर्निमन सर्कल गार्डनसमोर पोलीस वाहन थांबवून मला पो.नि. कारभारी यांनी पडताळणीच्या वेळी घ्यावयाचे दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.कारभारी यांनी त्यांचेकडिल डजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल



Scanned with CamScanner

बनियनला लावला व माझे सोबत पंच श्री कोरडे यांना लोकसेवक श्री गिते यांची प्रत्यक्ष भेट घेण्याकरिता पाठविले. मी व पंच पायी चालत रिझर्व्ह बॅंक गेटसमोर आलो. तेथे कंत्राटदार बबलू हे फुटपाथवर माझी वाट पहात उभे असलेले दिसले. प्रथम मीं बबलु सोबत माझे कामाचे अनु ंगाने बाललो असता बबलु यानें लोकसेवक श्री. गिते हे त्यांनी मागणी केलेली रक्कम कमी करण्यास तयार नाहीत असे सांगितले व नंतर बबलु यानें लोकसेवक श्री गिते यांना फोन करून आम्ही उभे असलेल्या ठिकाणी बोलावून घेतले. काही वेळाने लोकसेवक श्री गिते हे आम्ही उभे असलेल्या ठिकाणी पायी चालत आले. मी त्यांना लाचेची नक्की कीती रक्कम द्यायची याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचेसोबत आणलेल्या मोबाईलमध्ये पंच श्री कोरडे यांचे समक्ष रु. २७,००,०००/– अंक टाईप करुन मला तसेच बबलु व पंचास दाखविला. त्यावर मी आर्श्चयाने सत्तावीस लाख रूपये बबबब असे मोठयाने उद्‌गारलो. त्यावेळी बबलू याने मला हळू बोल असे सांगितले व श्री. गिते यांनी हाताने इशारा करून सदरची रक्कम कंत्राटदार बबलू यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावेळी कंत्राटदार बबलू हा श्री गिते यांना '' राउड फिगर २५ कर दो'' असे बोलले. तेव्हा लोकसेवक श्री गिते यांनी बबलुकडे इशारा करुन **''वो तुम्हारे पास''** असे बोलुन सदरची रक्कम कंत्राटदार बबलु कडे देण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. गिते हे परत पायी चालत त्यांचे कार्यालयाकडे निघून गेले व बबले यांने तो मला नंतर फोन करतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच कोरडे पायी चालत पोलीस वाहनाजवळ येवुन पो.नि. कारभारी यांना भेटलो. पो.नि. कारभारी यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी पंच श्री कोरडे यांचेकडे लोकसेवक व माझे प्रत्यक्ष भेटीत झालेल्या संभाषणाबाबत चौकशी केली असता पंच कोरडे यांनी वरिलप्रमाणे माहिती दिली.

त्यानंतर पो.नि. कारभारी व सपोआ देशमुख यांनी माझे व लोकसेवक गिते यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात जावून पंचांसमक्ष वाजवून ऐकणार असल्याचे सांगितले.

मी दिनांक १७/०३/२०२१ रोजी लोकसेवक श्री. गिते यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. गिते यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, दिनांक १८/०३/२०२१ रोजी सापळा कारवाई आयोजित करणार असल्याने लाचेची रक्कम सोबत घेवुन येण्याबाबत पो. नि. कारभारी यांनी मला सुचना दिल्या व दि.१८/०३/२०२१ रोजी सकाळी ला.प्र.वि. कार्यालयास बोलविले.

दिनांक १७/०३/२०२१ रोजी ठरल्याप्रमाणे मी दि.१८/०३/२०२१ रोजी लाचेच्या रक्कमेची व्यवस्था करून दुपारी १३.०० वाजता ला.प्र.वि. कार्यालयास पो.नि. कारभारी यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. कारभारी यांनी माझेकडे लाचेची रक्कम सोबत आणली आहे काय? अशी विचारणा केली. त्यावेळी मी माझे जवळ बचतीमधील फक्त रु. ५०,०००/– असल्याचे सांगुन मला त्याहून अधिक रक्कम उपलब्ध होवू ाकत नसल्याचे सांगितले. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. ५०,०००/– पो.नि. कारभारी यांचेकडे दिले. उर्वरीत रु.४,५०,०००/– इतकी रक्कम ही खेळण्यातील डमी नोटा लाच रक्कम म्हणुन वापरण्यात येणार असल्याचे मला स.पो.आ. देशमुख व पो.नि. कारभारी यांनी सांगितले. त्यानंतर माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माझे पॅन्टच्या उजव्या बाजुंचा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये माझे अंगझाडतीत मिळून आलेल्या वस्तु ठेवल्या. तद्‌नंतर पो.नि. कारभारी यांनी मी दिलेल्या रु.५०,०००/– रक्कमच्या नोटांचे त्यांच्या प्रिंटरवर झेरॉक्स प्रती काढल्या. त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाच्या गोपनिय कक्षामध्ये मला पंचासमक्ष ॲथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रत्याक्षिक करून दाखविले. तद्‌नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या व खेळण्याच्या डमी नोटाना दोन्ही बाजूस ॲथ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम एका पिवळया रंगाच्या कापडी पिशवीमध्ये घालून सदर कापडी पिशवीला देखील बाहेरून ॲथ्रसिन पावडर लावून सदरची पिशवी माझे पॅन्टचे डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्याचे पो.नि. कारभारी यांनी मला सांगितले.



Scanned with CamScanner

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाचे दक्षतेबाबत पो.नि. कारभारी यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. कंत्राटदार बबलु यानां लाचेची रक्कम देण्याअगोदर लोकसेवक श्री गिते यांना मोबाईलवर संपर्क करून स्पिकर ऑन करुन सदरची रक्कम आणली असल्याचे सांगून त्यांनी सदरची रक्कम कंत्राटदार बबलू यांचेकडे देण्याबाबत सांगितल्यांनंतरच लाचेची रक्कम बबलू यास द्यावी. सदरची रक्कम बबलू यांनी स्विकारल्यानंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझे डोळयावरील चष्मा काढुन हातात घेवुन फिरवत रहावे असा इशारा देणेबाबत सुचना दिली.

त्यानंतर मी व पंच श्री. कोरडे व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातुन सरकारी वाहनाने लोकसेवक श्री. गिते यांचे ए वार्ड, म.न.पा. कार्यालयाकडे निघालो असता, बबलु यांनी माझेशी संपर्क करुन काल भेटलेल्या ठिकाणी भेटण्यास बोलविले. त्याप्रमाणे आम्ही हॉर्नीमन सर्कल, फोर्ट येथे गेल्यावर पो.नि. कारभारी यांनी त्यांचे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला त्यानंतर मी व पंच कोरडे सरकारी वाहनातुन खाली उतरुन पायी चालत आर.बी.आय. बँकेच्या पाठीमागील गेट समोरील फुटपाथजवळ अगोदर भेटलेल्या ठिकाणी गेलो असता तेथे बबलु माझी वाट पाहत उभा असल्याा मला दिसुन आला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार व पंच श्री लांवाळे हे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने माझे पाठीमागे आजुबाजुस लांब उभे राहिले. मी बबलू यांस लोकसेवक श्री गिते यांना मोबाईलवर कॉल करण्यास सांगितले. तेव्हा बबलु याने त्यांचे मोबाईलवरुन श्री गिते यांचे मोबाईलवर फोन केला मी बबलु यास स्पिकर ऑन करण्यास सांगीतले. त्यानुसार बबलु याने स्पीकार ऑन करुन माझेकडे मोबाईल देवुन बोलण्यास सांगितले, तेव्हा श्री गिते यांना मी पाच लाख रुपये रक्कम आणली असल्याचे सांगितले. तेव्हा श्री गिते यांनी बबलू जवळ मोबाईल देण्यास सांगीतले. तेंव्हा बबलु व श्री गिते यांनी स्पीकर बंद करुन संभा न केले. त्यामुळे श्री गिते यांनी लाचेची रक्कम बबलु याचे कडे देण्याचे स्प ट मला न सांगीतल्याने मी बबलु यास पुन्हा श्री गिते यांना फोन करुन रक्कम बबलुकडे देण्याबाबत स्प ट सांगीतले असता बबलु याने श्री गिते यांचे सोबत त्याचे फोन मध्ये रेकॉर्ड झालेला संवाद मला फोनचा स्पीकर चालुकरुन एकवला. त्यामध्ये श्री गिते यांनी बबलु यास माझे कडुन पैसे घेवुन कुलबा, गार्डन हॉटेल येथे येण्यास सांगीतले असल्याचे मी ऐकले.

त्यानंतर मी माझे डाव्या खिश्यातील लाच रक्कमेची पिवळया रंगाची पिशवी डाव्या हाताने बाहेर काढुन कंत्राटदार बबलू यांचे समक्ष धरली असता, कंत्राटदार बबलू यांनी सदरची लाच रक्कम असलेली पिवळया रंगाची पिशवी त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली.

त्यावेळी मी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझ्या डोळयावरील चष्मा हाताने काढुन फिरवुन पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ पथकातील अंमलदारांनी पुढे येवून कंत्राटदार बबलू यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले. त्यावेळी मी रस्त्याचे दुसरे बाजुस गेलो

त्यानंतर पो.नि. कारभारी यांनी मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद करून स्वत:कडे ठेवला.

त्यानंतर सपोआ देशमुख यांनी कंत्राटदार बबलू यांचेकडे लोकसेवक श्री गिते यांचे ठावठिकाणा बाबत विचारणा केली असता, श्री गिते हे कुलाबा गार्डन हॉटेल जवळ असल्याचे सांगुन तेथे बबलु यास येण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणे पो.नि. कारभारी, एक अंमलदार व बबलु असे टॅक्सीमध्ये बसले व इतर सापळा पथकातील अंमलदार, पंच व मी असे आम्ही दोन्ही शासकिय वाहनासह टॅक्सीच्या मागेमागे लोकसेवक गिते यांनी सांगितल्याप्रमाणे कुलाबा गार्डन हॉटेल कडे जात असताना, कुलाबा रेडीओ क्लबच्या अलीकडे काही अंतरावर टॅक्सी थांबली. त्या मागोमाग काही अंतरावर सरकारी वाहन थांबले. बबलु हे टॅक्सीतुन उतरले त्यांचे मागोमाग पो.नि. कारभारी व अंमलदार उतरले. बबलु हे रोडचे दुसरे बाजुन कांही अंतर चालत गेले असता समारुन श्री गिते एका ॲक्टीव्हा स्कुटर वरुन आले. व बबलु यास समक्ष भेटले. त्यावेळी बबलु यांनी त्यांच्या हातातील लाचेच्या रक्कमेची पिवळया रंगाची पिशवी श्री गिते यांच्या हातात दिली. त्यानंतर त्वरीत पो.नि. कारभारी



Scanned with CamScanner

व सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक श्री गिते यांस लाचेच्या रक्कमेसही रंगेहात पकडले ते मी पाहीले.

त्यानंतर मी, पंच, सपोआ देशमुख व पोलीस पथक, बबलु, श्री गिते असे शासकीय वाहनाने मनपा ए वार्ड लोकसेवक श्री गिते यांचे कार्यालयात गेले तेथुन आम्ही सर्व लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे येवुन पुढील कायदेशीर कार्यवाही पुर्ण केली.

तरी लोकसेवक श्री. संदिप कारभारी गिते, सहायक अभियंता, ए वार्ड, म.न.पा. फोर्ट, मुंबई यांनी ससुन डॉक येथील बीपीटीच्या पडिक जागेवर बोटींचे सामान व खलाश्यांना राहणेकरिता गोडावून बांधण्याची परवानगी देण्याकरीता माझ्याकडे रू. ५०,००,०००/— इतकी लाचेची रक्कमेची मागणी करुन दिनांक १७/०३/२०२१ पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान रु.२७,००,०००/— तडजोडअंती रू. २५,००,०००/— इतकी लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केले व दिनांक १८/०३/२०२१ रोजीच्या पंचासमक्ष झालेल्या सापळा कारवाई दरम्यान कंत्राटदार बबलु यांचेकरवी तडजोडीअंती ठरलेल्या २५,००,०००/— रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणुन रु.५,००,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. संदिप कारभारी गिते व कंत्राटदार मुझफरअली बाबुअली सय्यद उर्फ बबलू यांचेविरूध्द तक्रार आहे.

माझा श्री. संदिप कारभारी गिते यांचेशी कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जबाब पो.नि. राहुल कारभारी यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( राहुल कारभारी )
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

किरण एल कोळी

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........................................................................................................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................................................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................................................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.१ यांनी 'फि' हे मासेमारीचा व्यवसाय करीत असल्याने त्यांचे बोटीचे सामान व खलाश्यांना राहण्याकरीता बीपीटीच्या मालकीच्या जागेवर गोडाऊन बांधण्याकरीता परवानगी देणेकरीता पडताळणी दरम्यान रू.२७,००,०००/- रक्कमेची लाच मागून तडजोडी अंती रू.२५,००,०००/- स्विकारण्याचे मान्य करून लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हफ्ता म्हणून रू.५,००,०००/- इतकी लाचेची रक्कम आरोपी क्र.२ (खाजगी इसम) यांचे मार्फतीने 'फि' कडून स्विकारून ती आरोपी क्र.२ कडून आरोपी क्र.१ यांनी स्विकारली असता त्यांना लाचेचे रक्कमेसह रंगेहात पकडले म्हणून गुन्हा कलम ७,७(अ) भ्र.प्र.अधि.१९८८ अन्वये नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........................................................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......................, जिल्हा ..................., राज्य ...................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. .......................................................... District................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..........................................
पदनाम Rank..........................................
तपासिक अं. चा कोड क्र. ..........................................
Posting
Code No. of I. O. ..........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner